Possession for protection KDMC New 06.10.2010

क्र.महसुल/क-१/टे-७/एलएनडी/शा.ज.संरक्षण/कल्याण/
एसआर-४/१०
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.
दिनांक-०६/१०/२०१०. 14 OCT 2010

वाचले- १. शासनाचे महसुल व वनविभाग परिपत्रक क्र जमीन/०७/२०१०/प्र.क्र९९/ज-१ दिनांक-२४/०९/२०१०.

२. शासनाचे महसलु व वनविभाग यांचेकडील परिपत्रक क्र एलएनडी/१०८३/२७०३/सीआर /१९/ज-५/ दिनांक ४/०२/८३.

३. आयुक्त कल्याण डोंबिवली महानगर पालिका, कल्याण यांचेकडील पत्र क्र जा.क्र.कडोमपा/-रवि/३४१८ दि. १८/९/२०१०. व जा.क्र.कडोमपा/रवि/३७६१ दि. ७/१०/२०१०

४. तहसिलदार, कल्याण यांचेकडील पत्र क्र जमिनबाब/टे-२/कावि-१८०४/१०दिनांक ३०/९/२०१०.

---

आदेश

ज्या अर्थी, उपोद्घातातील अनु क्रमांक १ अन्वये शासन मान्य विकास आराखडयात (प्रारुप किंवा प्रस्तावित विकास आराखडयात नव्हे) रस्ते, बगीचे, खेळाचे मैदान, उद्यान, पाणी पुरवठा, विज पुरवठा, पथदिप, मल निस्सारण, सांडपाणी, सार्वजनिक शौचालय, स्मशानभुमी, दफनभुमी, या सार्वजनिक सुविधांसाठी (Public Convenience) आरक्षित असलेल्या महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय जमिनीचा विनामुल्य आगावू ताबा संबंधित महापालिकेला देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

ज्या अर्थी, वरिल प्रयोजना व्यतिरिक्त शासन मान्य विकास आराखड्यात किंवा प्रारुप प्रस्तावित विकास आराखडयात अन्य प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या शासकीय जमिनीचे नियमानुसार योग्य ते मुल्य वसुल केल्यानंतरच जमिनीचा आगावू ताबा देण्यात यावा. मात्र तोपर्यंत सदर जमीन संरक्षणासाठी संबंधित महानगरपालिकेस सोपविणेत यावी सदर जमिनीचे अतिक्रमणापासुन संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिकेची राहिल. असे उपोद्घातातील अनुक्रमांक १ मधील शासनाचे परिपत्रकामध्ये निर्देशित केलेले आहे.

आणि ज्यां अर्थी, कल्याण डोंबिवली महानगर पालिका यांनी उपोद्घातातील अनु क्रमांक ३ नुसार सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये दर्शविलेल्या कल्याण तालुक्यातील रकाना क्रमांक ५ वरील क्षेत्र व रकाना क्रमांक ७ वर नमुद शासन मान्य विकास आराखड्यातील व प्रारुप किंवा प्रस्तावित विकास आराखडयातील प्रयोजनानुसार, सार्वजनिक सुविधेसाठी आरक्षित असल्याने महानगरपालिकेकडे संरक्षणासाठी हस्तांतरीत करण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे

ज्या अर्थी, उपरोक्त जमीनी संबंधी तहसिलदार, कल्याण यांनी उपोद्घातातील अ.क्र. ४ नुसार अहवाल या कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

त्या अर्थी, मी, ए. एल. जऱ्हाड, जिल्हाधिकारी ठाणे, मला उपोद्घातातील अनुक्रमांक १ मध्ये दिलेल्या अधिकारांचा वापर करुन सदर आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या कल्याण तालुक्यातील व कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शासन मान्य विकास आराखड्यात किंवा प्रारुप प्रस्तावित विकास आराखडयात, अन्य सार्वजनिक सुविधेसाठी आरक्षित असलेल्या व रकाना क्र. ५ मध्ये नमुद केलेल्या क्षेत्राचा रकाना क्र. ७ मध्ये नमुद केलेल्या आरक्षणाच्या अनुषंगाने सदर जमिनीचे आगाऊ ताबा दिलेले क्षेत्र वगळून उर्वरीत शिल्लक क्षेत्र आहे त्या स्थितीत अतिक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी कल्याण डोंबिवली महानगर पालिकेकडे खालील अटी व शर्तीस अधिन राहून सोपविण्यात येत आहे.

अटी व शर्ती.

१. सदर जागेचे शासन निर्णयानुसार अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिकेची राहिल.

२. शासन मान्य विकास आराखडयात व प्रारुप किंवा प्रस्तावित विकास आराखडयात रस्ते, बगीचे, खेळाचे मैदान, उद्यान, पाणी पुरवठा, विज पुरवठा, पथदिप, मल निस्सारण, सांडपाणी, सार्वजनिक शौचालय, स्मशानभुमी, दफनभुमी, या सार्वजनिक सुविधांसाठी (Public Convenience) आरक्षित असलेल्या प्रयोजनाव्यतिरिक्त शासन मान्य विकास आराखड्यात अन्य प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या शासकीय जमिनीचे नियमानुसार योग्य ते मुल्य वसुल केल्यानंतरच जमिनीचा आगावू ताबा